जाहीर नोटीस
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, ...

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी व जिल्हा न्यायालयाचे अधिपत्याखाली येणाऱ्या न्यायालयांत खाली नमुद केलेप्रमाणे अग्निशामक दंडगोल पुनर्भारीत करावयाचे आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ति अगर संस्थेस वर नमूद केलेप्रमाणे अग्निशामक दंडगोल पुनर्भारित/दुरुस्त करुन पुरविणे शक्य असेल त्यांनी सदर कामाबाबत येणा—या खर्चाचे दरपत्रक त्यांनी खालील अटी व शर्तीस अधिन राहून हि नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासुन पंधरा दिवसांचे आत म्हणजेच ३०/१०/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून दयावे.

माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२५ मध्ये पुर्नभारित करावयाच्या अग्निशामक दंडगोलांची माहिती

अ.नं.	न्यायालयाचे नाव	अग्निशामक दंडगोल प्रकार	दंडगोल संख्या
१	जिल्हा न्यायालय, रत्नागिरी	A.B.C. - 06 K.g.	१४
		A.B.C. - 09 K.g.	०२
		A.B.C. - 10 K.g.	०६
५	दिवाणी न्यायालय क.स्तर, दापोली	A.B.C. - 06 K.g.	०६
		CO2 - 06 K.g.	०६
६	दिवाणी न्यायालय क.स्तर, खेड	Dry Chemical Powder type stored pressure	०५
७	दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण	A.B.C.06 K.g.	०४
		D.C.P. 05 K.g.	०२
		D.C.P. 10 K.g.	०१
		A.B.C. 06 K.g.	०१
८	दिवाणी न्यायालय क.स्तर, गुहागर	A.B.C. - 05 K.g.	०१
		D.C.P. 05 K.g.	०४
९	दिवाणी न्यायालय, देवरुख	A.B.C. - 06 K.g.	०६
		A.B.C. - 10 K.g.	११
१०	दिवाणी न्यायालय, लांजा	A.B.C.06 K.g.	०२
	दिवाणी न्यायालय, राजापूर	A.B.C.06 K.g.	०३
		एकुण	**७४**

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. लखोटयावर **'अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करणेचे दरपत्रक'** असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारातघेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तूचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करणेचे कामी आवश्यक असलेले रसायन/पावडर तसेच तत्सम लागणाऱ्या वस्तू हया चांगल्या स्थितीत व आय.एस.आय. दर्जाचे अथवा समांतर दर्जाचे असणे आवश्यक असून तसे दरपत्रकात नमूद करणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक देणा–या व्यक्तिने आपले दुकानाचे लायसन्सची झेरॉक्स प्रत, पॅन कार्डची झेरॉक्स प्रत, सीजीएसटी/एसजीएसटी नंबरची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अग्निशामक दंडगोल पुनर्भारित करणारी व्यक्ति/संस्था/पुरवठादार ही संबंधित कामाबाबत म्हणजेच कंपनीची अधिकृत विक्रेता असणे आवश्यक असून त्याबाबतची कागदपत्रे दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अग्निशामक दंडगोल पुनर्भारित केलेनंतर ते योग्यप्रकारे पुनर्भारित केलेले आहेत याबाबत योग्य त्या एजन्सीमार्फत तपासून आवश्यक ते प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

७. दरपत्रक देणाऱ्या व्यक्तिने देयकाची रक्कम ज्या बॅंक खात्यामध्ये जमा करावयाची आहे ते खाते पॅनकार्ड जोडून अद्ययावत करावे अन्यथा प्रदाने वेळेत होऊ शकणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचा राहील.

आज दि. १६/१०/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक– १६/१०/२०२५.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
डिस्ट्रीक्ट कोर्ट, रत्नागिरी

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

म.जा.क्र.वित्त/६४०८ सन २०२५
जिल्हा न्यायालय,रत्नागिरी
दिनांक :– १६/१०/२०२५

<u>प्रत-नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी–</u>
सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.